एपीएल शेतकऱ्यांना ३० डिसेंबर पर्यंत बँक खाते तपशिलासह आधार संलग्निकरण करण्याचे जिल्हाधिकारी स्वामी यांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

उन्नत शेतकरी गटातील शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना प्रति कुटुंब सदस्य १७० रुपये अनुदान देण्याची पुरवठा विभागाची योजना आहे. शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात ही योजना राबविली जाते. तथापि, जिल्ह्यातील ३१ हजार ६१४ शेतकऱ्यांचे अनुदान वितरण बँक खाते तपशिल उपलब्ध न करुन दिल्यामुळे प्रलंबित आहे. हे अनुदान वितरणातील सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करुन डिसेंबर अखेर अनुदान वितरण करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज पुरवठा विभागाला दिले. अनुदान वितरण प्रलंबित असलेल्या शेतकऱ्यांपैकी बँक खात्याचे तपशिल नसणे, तसेच आधार संलग्निकरण नसणे या दोन प्रमुख तांत्रिक अडचणी असून शेतकऱ्यांनी दि.३० डिसेंबर पर्यंत आपले आधार संलग्निकरण करुन घ्यावे,असे आवाहनही जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात आज पुरवठा विभागाची बैठक घेण्यात आली. जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी तसेच सर्व तालुकास्तरीय अधिकारी, पुरवठा निरीक्षक, अन्नधान्य वितरण अधिकारी आदी उपस्थित होते. बैठकीत दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात उन्नत शेतकरी गटातील (एपीएल फार्मर)३१ हजार ६१४ शेतकऱ्यांचे अनुदान वितरण प्रलंबित आहे. हे अनुदान शिधापत्रिकेवरील प्रति सदस्य १७० रुपये प्रमाणे दरमहा दिले जाते. तथापि, त्यासाठी बँक खाते तपशिल व आधार संलग्निकरण असणे आवश्यक आहे. अद्याप १७ हजार लाभार्थ्यांचे आधार संलग्निकरण प्रलंबित आहे. तर ३१ हजार ६१४ जणांचे बँक खाते तपशिल नसल्याची माहिती देण्यात आली. तसेच आतापर्यंत २५ हजार ७८६ शिधापत्रिका धारकांना २५ कोटी ३९ लक्ष रुपयांचा लाभ मार्च अखेर वितरीत झाला आहे. जिल्हाधिकारी स्वामी यांनी निर्देश दिले की, शेतकऱ्यांचे आधार संलग्निकरण, बँक तपशिल गोळा करण्यासाठी विशेष मोहिम राबवून माहिती घ्यावी. तसेच शेतकऱ्यांनीही आपले आधारसंलग्निकरण दि.३० डिसेंबर पर्यंत करुन घ्यावे,असे आवाहन करण्यात यावे. डिसेंबर अखेर प्रलंबित अनुदान वितरणाचा प्रश्न निकाली काढावा,असे निर्देश त्यांनी दिले.यासोबतच अन्य योजनांसाठीही आधार संलग्निकरण, ई-केवायसी याबाबतही आढावा घेण्यात आला.स्वस्तधान्य दुकानातील अन्न धान्य मिळण्यासाठी शिधापत्रिकेवरील प्रत्येक लाभार्थ्यांचे ई-केवायसी करण्याची मोहिमही राबवावी.

शिधापत्रिकेसोबत कुटुंबप्रमुखाच्या मोबाईल क्रमांकाचे संलग्निकरण करावे,असे निर्देशही जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

आईचा सांभाळ न करणाऱ्या बापाचा मुलाने केला खून; वेरूळ येथील घटनेचा उलगडा

खुलताबाद /प्रतिनिधी

कुटुंबियांचा सांभाळ करत नसल्याच्या कारणावरून तालुक्यातील तिसगाव तांडा येथील एका व्यक्तीचा त्याच्या मुलाने गळा आवळून खून केल्याची घटना २९ नोव्हेंबर रोजी घडली. याप्रकरणी मंगळवारी खुलताबाद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती पोलिस निरीक्षक धनंजय फराटे यांनी दिली. शांतीलाल कोमा राठोड (५०, रा. तिसगाव तांडा) असे मृताचे नाव असून मुलगा धीरज (२७, रा. गिरनेरतांडा, ता. छत्रपती संभाजीनगर) हा आरोपी आहे.याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोलापूर-धुळे महामार्गावरील वेरूळ येथील उड्डाणपुलाखाली शांतीलाल कोमा राठोड यांचा मृतदेह २९ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास आढळला होता. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात नेला. त्यानंतर खुलताबाद ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. दरम्यान, धीरज हा वडिलाच्या अंत्यविधीला आला असता पोलिसांना त्याच्याविषयी संशय आला. त्यानंतर पोलिसांनी त्याच्यावर पाळत ठेवली. त्यानंतर ३ डिसेंबर रोजी पोलिसांनी धीरजला ताब्यात घेऊन ठाण्यात आणले. याप्रकरणी चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, त्यानंतर पोलिसांनी पोलिसी खाक्या दाखवताच आरोपीने पित्याचा खून केल्याची कबुली दिली. याप्रकरणी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर त्यास बुधवारी खुलताबाद येथील न्यायालयासमोर उभे केले असता न्यायालयाने त्याला ३ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.बाप राहत होता कुटुंबापासून वेगळा मृत शांतीलाल राठोड यांच्या पश्चात पत्नी व एक मुलगा आहे. शांतीलाल यांचे काही कारणावरून पत्नी व मुलासोबत पटत नव्हते. त्यामुळे शांतीलाल हे तिसगाव तांडा येथे एकटे राहत होते.

तर मुलगा धीरज व त्याची आई गिरनेर तांडा येथे राहत होते. बाप आईसह मुलाला सांभाळत नसल्याने धीरजला बापाविषयी मनात चीड येत होती. यावरून बापाचा गळा आवळून खून केल्याची कबुली धीरजने पोलिसांना दिली.

उत्कृष्ट सेवा केल्याबद्दल पोलिस निरीक्षक गणेश ताठे यांचा गौरव

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

पोलिस आयुक्तालयात बुधवारी पोलिस आयुक्त प्रविण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे आणि कायदा सुव्यवस्थेबाबत आढावा बैठक पार पडली.

या बैठकीत विविध गुन्ह्यात तसेच निवडणूक बंदोबस्तात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल अधिकारी आणि अमलदार यांना प्रशस्तीपत्र देत गौरवण्यात आले. यामध्ये छत्रपती संभाजीनगर सुरक्षा शाखेचे पोलिस निरीक्षक गणेश ताठे यांचाही सहभाग होता. यावेळी पोलिस उपायुक्त नवनीत कॉवत, प्रशांत स्वामी आदींची उपस्थिती होती.भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने १४ नोव्हेंबर २०२४ रोजी छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर प्रचार सभेसाठी आले होते. पतंप्रधानांसोबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व इतर मंत्री महोदय उपस्थितीत होते. पंतप्रधान व इतर महत्वाच्या व्यक्तींच्या सुरक्षेच्या अनुषंगाने सुरक्षा शाखा, छत्रपती संभाजीनगर येथुन बंदोबस्त योजना निर्गमित करण्यात आली होती.

पुन्हा खून । रात्री किरकोळ कारणावरून मजूराची हत्या

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

शहरातील मिसरवाडी भागातील सनी सेंटर येथील मैदानात एका मजुराची किरकोळ कारणावरून हत्या करण्यात आली आहे. मैदानातील व मयताच्या परिचयातीलच दोन ते तीन जणांनी चाकूने वार करत हत्या केल्याची घटना गुरुवारी, ५ डिसेंबर रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास घडली. यात विकास ज्ञानदेव खळगे (वय ३१, रा. मिसारवाडी) असे मयताचे नाव आहे. त्याच्यासोबत त्याचा भाचा गौतम राजू जाधव (वय २१, रा.मिसारवाडी) हा देखील जखमी झाला आहे. त्याच्यावर सध्या घाटी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. अधिक माहितीनुसार, मयत विकास हा सनी सेंटर येथील मैदानावर गेला होता. त्याठिकाणी त्यांच्या गल्लीतील दोन ते तीन बसलेले होते. त्यांच्यात किरकोळ कारणावरून शाब्दिक चकमक झाली. त्याचे परिवर्तन काही वेळातच हाणामारीत झाले.

SAYALI CHARITABLE TRUST'S COLLEGE OF PHARMACY

GUT NO. 141, 150, NASHIK ROAD, MITMITA, AURANAGBAD
(DIPLOMA IN PHARMACY), INST CODE : 0797, Choice Code: 220232310
Date: 07.12.2024

NOTIFICATION

REGARDING ADMISSION TO FIRST YEAR D.PHARMACY 2024-2025

This notification is issued in pursuant of the admission rules and procedure of D.T.E. Mumbai & Govt. of Maharashtra for Academic year 2024-25 regarding admission to First Year D.Pharmacy against the vacant seats to be filled at the Institute level and Against CAP after the last round of Centralized Admission Process (CAP) by competent Authority.

The detailed schedule for admission is given below:

Sr. No.	Activity	Schedule	
		First date	Last date
01	Availability of Application forms.	08/12/2024	12/12/2024 upto 5:00 pm
02	Display of Provisional Merit List on College Notice Board.	12/12/2024 at 1:00 pm	
03	Display of Final Merit List.	12/12/2024 at 05:00PM	
04	Confirmation of admission by the candidates allotted the seats by remitting the prescribed fees.	13/12/2024	13/12/2024

Contact Number: 09823019534, 09422709440

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश क.स्तर सोयगाव यांचे न्यायालय

किरकोळ दिणी अर्ज क्र.२०९/२०२४

अर्जदार : १) शालीनी मंगेश बिरारे, वय-३५ वर्ष, धंदा-शेती
२) श्वेता मंगेश बिरारे, वय-१३ वर्ष, धंदा-शेती
३) कोमल मंगेश बिरारे, वय-१२ वर्ष, धंदा-शेती
४) वंश मंगेश बिरारे, वय-१० वर्ष, धंदा-शेती
वरील सर्व अर्जदार रा. फर्दापुर, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व संबंधितांस जाहीर प्रकटन द्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर.एस. महाजन साहेब. सोयगाव, ता. सोयगाव, जि.औरंगाबाद यांच्यामार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र साठी अर्ज केलेला आहे. मयत नामे मंगेश मधुकर बिरारे हे दिनांक २४/०५/२०२३ ला मौजे फर्दापूर, ता.सोयगाव, जि.औरंगाबाद येथे मयत झालेले असून त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतीसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे.

(पुढील दिनांक : २०/०१/२०२५)

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रांसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक ०६/१२/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपिक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर सोयगाव, जि.औरंगाबाद

जाहीर प्रगटन

पैठण येथील मा. दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांचे न्यायालयातून

सिव्हील एमएनं.४१९/२०२४ पु.ता.९-१-२०२५

अर्जदार क्र.१. साबीया बेगम सत्तार शेख, वय ५३, धंदा - घरकाम, रा. जाधववाडी, उ.पैठण, जि. औरंगाबाद. २. आतीया परवीन आसेफ शेख, वय ३८, धंदा - घरकाम, रा.स्नेहनगर, अब्दुल नबी चौक, सिल्लोड, जि.औरंगाबाद. ३. साजेद सत्तार शेख, वय ३८, धंदा - व्यापार, रा. जाधववाडी, उ. पैठण, नाथनगर, ता.पैठण, जि.औरंगाबाद. ४. माजेद सत्तार शेख, वय ३६, धंदा - खासगी नोकरी, रा. कम्युनिटी हॉलजवळ, जायकवाडी, उ.पैठण, ता.पैठण,जि.औरंगाबाद. ५. शिरीन कौसर वाजीद खान, वय ३५, धंदा - घरकाम, रा.मु.पो. भराडी, ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद. ६. जुनेद म. सत्तार शेख, वय ३०, धंदा - खासगी नोकरी, रा. नाथनगर, जायकवाडी, उ. ता.पैठण, जि. औरंगाबाद.

विरुद्ध -

गैरअर्जदार महाराष्ट्र शासनतर्फे जिल्हाधिकारी, औरंगाबाद.

प्रकरण - लिगल हेअरशिप सर्टीफिकेट मिळणेबाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी मा. न्यायालयात ॲड. सोपान बी.घोडके, औरंगाबाद यांच्यामार्फत अर्ज दाखल केला आहे की, मयत सत्तार म. सरदार शेख यांचे दि.९-१२-२०२३ रोजी जायकवाडी उ. कातपूर ता.पैठण,जि.छत्रपती संभाजीनगर येथे हृदयविकाराच्या झटक्यामुळे निधन झालेले असून अर्जदार क्र.१ ही मयताची विधवा पत्नी असून अर्जदार क्र.२ व ५ या मयताच्या विवाहीत मुलगी व अर्जदार क्र.३, ४ व ६ हे मयताची मुले आहेत. अर्जदार क्र.१ ते ६ हेच मयताचे एकमेव व वर्ग १ चे कायदेशीर वारसदार असून अर्जदाराव्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणतेही जिवंत अथवा मृत वारसदार नाही, करिता कार्यालयीन कामाकरिता अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारसदार असल्याचे घोषीत होऊन अर्जदाराच्या नावे लिगल हेअरशिप सर्टीफिकेटची मागणी अर्जदाराने सदरील अर्जात केली आहे. त्याअर्थी सदरहू जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराच्या नावे लिगल हेअरशिप सर्टीफिकेट देण्यास आक्षेप असेल त्यांनी सदर जाहीर प्रगटन ३० दिवसाचे आत मा. न्यायालयात लेखी नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे लिगल हेअरशिप सर्टीफिकेट देण्यात येईल. मुदतीनंतरचे अर्ज ग्राह्य धरले जाणार नाही, करिता आज दि.४-१२-२०२४ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-,
न्यायालयीन अधीक्षक,
दिवाणी न्यायालय,क.स्तर,
पैठण

जाहीर प्रगटन

मा. सहदिवाणी न्यायाधीश साहेब श्री. बेदरकर साहेब, क.स्तर कोर्ट ३रे, औरंगाबाद यांच्या न्यायालयात

सिव्हील एम.ए.क्र.१८०८/२०२४
पुढील तारीख - ६/१/२०२५

अर्जदार : १. जनार्धन पिता छगनराव उदावंत, वय-५४ वर्ष, धंदा-व्यापार, रा. प्रकाशनगर, रामनगर, औरंगाबाद
२. लक्ष्मण पिता छगनराव उदावंत, वय-४८ वर्ष, धंदा-व्यापार, रा.कामगार कॉलनी, चिकलठाणा, औरंगाबाद.
३. पुजा भ्र.अनिल टाक, वय-५३ वर्ष, धंदा-घरकाम, रा.कामगार कॉलनी, चिकलठाणा, औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी, औरंगाबाद

विषय : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अपेण्डीक्स व अन्वये लिगल हेअरशिप सर्टीफिकेट मिळणेबाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदाराने या न्यायालयात ॲड. दिपक ज. सोरमारे यांच्यामार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई नामे-यमुनाबाई भ्र. छगनराव उदावंत यांचे दिनांक ०८.०४.२०२४ रोजी औरंगाबाद येथे निधन झाले असून अर्जदाराचे वडील नामे-छगनराव सिताराम उदावंत यांचे दिनांक १३.०८.२०२३ रोजी औरंगाबाद येथे निधन झालेले आहे. अर्जदार क्र.१ ते ३ हेच मयतांच्या पश्चात कायदेशीर वारसदार असून मयतांना वर नमुद अर्जदारांशिवाय अन्य कोणतेही कायदेशीर वारसदार नाही. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामकाजाकरीता मयताचे कायदेशीर वारसदार असल्याचे वारस प्रमाणपत्र (हेअरशिप सर्टीफिकेट) ची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुतचे प्रकरण मा. न्यायालयात दाखल केले आहे.

या जाहीर प्रगटनद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे अर्जदार यांना वारसहक्क प्रमाणपत्र/लिगल हेअरशिप सर्टीफिकेट देण्याबाबत कोणाचाही उजर आक्षेप असेल अशांनी सदर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आपला लेखी उजर,आक्षेप योग्य त्या कागदपत्री पुराव्यासह या मा. न्यायालयात नोंदवावा, मुदतीत कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर आक्षेप न अल्यास अर्जदारांना वारसहक्क सर्टीफिकेट देण्यात येईल व मुदतीनंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. करीता आज दिनांक ०७/१२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

क.लिपीक न्यायालय अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, औरंगाबाद

जाहीर प्रगटन

मौजे कांचनवाडी ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथील गट नं.२३ मधील साफल्य सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्लॉट नं.२० बाबत.

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी श्रीमती वैजयंती गोपाळ हुलसूलकर रा. कार्डा कॉर्नर जवळ छत्रपती संभाजीनगर यांच्या मालकी व ताब्यातील मौजे कांचनवाडी ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथील गट नं.२३ मधील साफल्य सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्लॉट नं.२० ज्याचे क्षेत्रफळ २८५ चौ.मी. (लांबी १९ मी., रूंदी १५ मी) म्हणजेच ३०६७ चौ.फू. अशी मिळकत असून सदरील मिळकत ही कायमस्वरूपी खरेदीचा करार दि.३-१२-२०२४ रोजी करण्यात आलेला आहे. सदरील मिळकतीच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत.

पूर्वेस - प्लॉट नं.२१, पश्चिमेस प्लॉट नं.१९, दक्षिणेस - संताजी सोसायटी, ज्याचे प्लॉटस उत्तर ९.०० मी. रोडवर नमुद चतु:सीमेच्या आतील मिळकत माझे पक्षकार यांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचा तोंडी करार केला आहे. माझे पक्षकारास अशी हमी दिली आहे की, सदरील मिळकत ही निर्जोखीम आहे. तरी वरील परिशिष्टातील नमुद मिळकतीशी कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध अथवा आक्षेप जसे की, दान, गहान, बक्षीस, दावा, डिक्री, बँकेचा कर्जबोजा, चोळी-बांगडी, विक्री, वारसाहक्क, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क, आक्षेप व उजर असेल तर त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसाचे आत मुळ कागदपत्रासह आपला उजर लेखी स्वरूपात माझ्या खालील पत्यावर नोंदवावा व त्याची पोच घ्यावी. मुदतीत कोणाचाही उजर न आल्यास सदरील मिळकत दोषमुक्त आहे असे समजून माझे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतरचा उजर, आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि.६-१२-२०२४ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

मार्फत,
ॲड. अजीत चोरमल,
२०६, परितोष विहार,
अशोकनगर,
छत्रपती संभाजीनगर
मो.९३७३०८०३७६

जाहीर प्रगटन

खुलताबाद येथील मा. दिवाणी न्यायाधीश क.स्तर खुलताबाद यांच्या न्यायालयात

एमएआरजेआय नं.२०४/२०२४
पु.ता.१८-१-२०२५

अर्जदार - १. शैलजा भ्र.धनंजय देशपांडे, वय ७७, धंदा - घरकाम, रा. बी २०३, माऊंट ॲप्स, भक्तीपार्क, आयमॅक्स थिअटरजवळ वडाळा, ईस्ट मुंबई. २. माधवी भ्र. श्रीनिवास राबूरी, ऊर्फ माधवी पी. धनंजय देशपांडे, वय ५१, धंदा - वकिली व शेती, रा. ए ८०३, जिऑन बिल्डींग भक्तीपार्क, आयमॅक्स थिअटरजवळ वडाळा, ईस्ट मुंबई. ३. मृणालीनी भ्र. सिद्धार्थ देशपांडे ऊर्फ मृणालीनी धनंजय देशपांडे, वय ५०, धंदा - व्यवसाय, रा. प्लॉट नं.ए ४, मुथीयान वैभव अपार्टमेंट, वारे हॉस्पिटलसमोर उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर. ४. चेतना भ्र. अमृत भालेराव ऊर्फ चेतना पी. धनंजय देशपांडे, वय ४८, धंदा - घरकाम, रा. ५०/६, शिवसुंदर अपार्टमेंट, नारायण अपार्टमेंटजवळ, खरे टाऊन, धरमपेठ नागपूर.

तर्फे विशेष मुक्तीयार धारक सिद्धार्थ रमेश देशपांडे, वय सज्ञान, धंदा - वकिली व शेती. रा. प्लॉट नं. ए ४, मुथीयान वैभव अपार्टमेंट, वारे हॉस्पिटलसमोर उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर.

विरुद्ध - गैरअर्जदार महाराष्ट्र शासनतर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.

प्रकरण - वारसाहक्क प्रकरण/हेअरशिप सर्टीफिकेट मिळणेबाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार याने ॲड.ओंकार अशोक आडगावकर यांच्यामार्फत मा. दिवाणी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे धनंजय गोविंद देशपांडे असून त्यांचा मृत्यू २१-७-२०१९ रोजी पुणे येथे झाला आहे. अर्जदार क्र.१ ते ४ हेच मयताचे वारसदार आहेत. अर्जदार क्र.१ ते ४ यांच्याशिवाय मयतास दुसरे कोणतेही वारसदार नाहीत. मयत धनंजय गोविंद देशपांडे व अर्जदार क्र.२ माधवी पी. धनंजय देशपांडे यांच्या नावे संयुक्त मिळकत प्लॉट नं.३२, गट ७९, गिरीजा ग्रुप, सुरभी पार्क मु.पो.म्हैसमाळ, ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर, ज्याचे क्षेत्रफळ ७५० चौ.मी. यामधील अर्धी मिळकत अर्जदार क्र.१ ते ४ यांचे नावे वारसाने होण्याकरिता अर्जदार १ ते ४ यांना हेअरशिप सर्टीफिकेटची आवश्यकता आहे.

तरी मयत धनंजय गोविंद देशपांडे यांचा मृत्यू २१-७-२०१९ रोजी झाला आहे. व मयताचे वारस असलयाबाबत वरील मिळकत वारसाचे नावे होण्याकरिता अर्जदार १ ते ४ यांनी लिगल हेअरशिप मिळण्याकरिता न्यायालयात दाखल केले आहे.

तरी अर्जदार क्र.१ ते ४ यांना हेअरशिप सर्टीफिकेट मिळण्यास ज्या कोणास हरकत असेल अशांनी जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून, उजर, आक्षेप मा. न्यायालयात दाखल करावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

आज दि.६-१२-२०२४ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून,
अधीक्षक,
दिवाणी न्यायालय,
क.स्तर खुलताबाद

जाहीर नोटीस

खुलताबाद येथील श्रीमती एम. ए.के. शेख मॅडम, दिवाणी न्यायाधीश खुलताबाद यांचे न्यायालयात

नियमीत दावा क्र.६३/२०२४
वादी - अरुणा भ्र.एकनाथ राऊत
विरुद्ध - प्रतिवादी - अशोक पी. तुळशीराम हिवर्डे व इतर.
प्रकरण - वाटणी होऊन स्वतंत्र ताबा मिळणेबाबत.

प्रतिवादी - ७. आप्पाराव पी. काशिनाथ हिवर्डे, वय ४५, धंदा - ड्रायव्हर, ८. साहेबराव पी. काशिनाथ हिवर्डे, वय ३८, धंदा - नोकरी, बाळू पी. काशिनाथ हिवर्डे, वय ३०, धंदा - ड्रायव्हर, सर्व रा.खिर्डी, ता.खुलताबाद,जि.औरंगाबाद. १०. सुमन पी. धोंडीराम जाधव, वय ४३, धंदा - घरकाम, रा. गल्लेबोरगाव, ता.खुलताबाद,जि. औरंगाबाद. ११. सिंधुबाई भ्र.अशोक बाखडे, वय ४१, धंदा - घरकाम, रा.खिर्डी, ता.खुलताबाद,जि. औरंगाबाद. १२. शांताबाई काशिनाथ हिवर्डे, वय ६४, धंदा - घरकाम, रा. खिर्डी, ता.खुलताबाद,जि. औरंगाबाद. १७. सुनंदा भ्र. संजय हिवर्डे, वय २७, धंदा - घरकाम, रा.खिर्डी, ता.खुलताबाद,जि. औरंगाबाद. १८. बबाबाई भ्र.नामदेव सुंब, वय ५०, धंदा - शेती. रा.मांजरी, ता.गंगापूर,जि.औरंगाबाद. १९. कचरू पी. देवराव काळे, वय ४०, धंदा - शेती, रा. सालुखेडा, ता.खुलताबाद. २०. सुमनबाई भ्र.नामदेव सुंभ, वय ५०, धंदा - शेती, रा.मांजरी, ता.गंगापूर,जि.औरंगाबाद. २१. ठकूबाई अंबादास साळुंके, वय ४५, धंदा - शेती, रा.शिरोडी, जि. औरंगाबाद. २२. नारायण धोंडीबा वायसळ, वय ४२, धंदा - शेती. रा. गंधेश्वर, ता.गंगापूर,जि. औरंगाबाद. २३. गोरख धोंडीबा वायसाळ, वय ४०, धंदा - शेती, रा. गंधेश्वर, ता.गंगापूर,जि. औरंगाबाद. २४. सुक्ल्याबाई रामनाथ मुळे, वय ३८, धंदा - शेती, रा.गेवराई, ता.गंगापूर, जि. औरंगाबाद. २५. शामु विठ्ठल म्हसरूप, वय ३६, धंदा - शेती, रा.पळसवाडी, जि.औरंगाबाद. २६. लक्ष्मण विठ्ठल म्हसरूप, वय ३६,धंदा - शेती, रा. पळसवाडी, जि.औरंगाबाद. २७. छबाबाई भ्र. कचरू गवळी, वय ३९, धंदा - शेती, रा.खाडगाव, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद. २८. निलाबाई कारभारी कुटे, वय ३४, धंदा - शेती, रा.टाकळी लव्हाळी, ता.कन्नड, जि.औरंगाबाद. २९.जयाबाई भ्र. मुरलीधर नागे, वय ३८, धंदा - शेती, रा.सराई, ता.खुलताबाद,जि.औरंगाबाद.

ज्याअर्थी उपरोक्त वादी यांनी मा.न्यायालयात दावा दाखल केला आहे की, सदर दाव्यात आपणास वेळोवेळी समन्स दिलेले आहेत. आपण दिलेल्या पत्यावर समन्स तालीम होऊ शकले नाही. तसेच आपण दिलेल्या तारखेवर हजर झाले नाही म्हणून प्रतिवादी यांनी या जाहीर समन्सद्वारे सूचित करण्यात येते की, आपण खुलताबाद येथील मा. न्यायालयात प्रकरणाच्या पुढील तारीख १७-१-२०२५ पर्यंत मा. न्यायालयात हजर होऊन आपले म्हणणे विधी तज्ज्ञामार्फत किंवा आपण स्वत: आपले म्हणणे व जवाब योग्य त्या कागदपत्रासह सादर करावे. जर आपण उपस्थित राहिला नाही तर न्यायालय आपणाविरुद्ध एकतर्फी आदेश देण्याची कारवाई करेल. आज दि.७-१२-२४ रोजी माझ्या सही व सहीनिशी दिले.

स्वाक्षरित/-
सहाय्यक अधीक्षक,
दिवाणी व फौजदारी
खुलताबाद

जाहीर प्रगटन

मा. सहदिवाणी न्यायाधीश श्री. सय्यद साहेब, क.स्तर, कोर्ट ५ वे औरंगाबाद यांच्या न्यायालयात

सिव्हील एम.ए. क्र. १८४७/२०२४
पुढील तारीख -२३/१२/२०२५

अर्जदार : १. हसन अली रजा पिता सय्यद अली रजा वय-४७ वर्षे, धंदा-सॉफ्टवेअर इंजिनिअरींग, रा. विसेनवेग, ११-ए, सुह, स्वित्झरलॅण्ड.
२. झैन अली रजा पिता सय्यद अली रजा, वय-४३ वर्षे, धंदा-डॉक्टर, रा.२९, पॅराडाईज् लेन, बरम्हिंगम, बी-२८, डीवाय युनायटेड किंगडम.
तर्फे विशेष मुखत्यार धारक -
नुसरत रजा रजवी, वय-६३ वर्षे, धंदा-घरकाम पी-१, १७३-ए, एन-३, सिडको, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

// विरूद्ध //

गैरअर्जदार : महाराष्ट्रशासन तर्फे जिल्हाधिकारी, औरंगाबाद.

विषय : लेटर ऑफ ॲडमिनीस्ट्रेशन मिळणेबाबत

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी या मा. न्यायालयात ॲड. दिपक ज. सोरमारे यांच्यामार्फत अर्ज दाखल केला आहे की, सय्यद अली रजा यांचे दि.३१.०५.२०११ रोजी युनायटेड किंगडम येथे तर निघत सुलताना रजा यांचे दि.३०.०८.२०१४ रोजी स्वित्झरलॅण्ड येथे निधन झालेले आहे. त्यांच्या पश्चात अर्जदार क्र. १ व २ हे त्यांचे मुले असून कायदेशीर वारसदार आहे. मयतांच्या नावे प्लॉट नं.१७७, सेक्टर एन-३, सिडको, छ.संभाजीनगर (औरंगाबाद) ज्याचे क्षेत्रफळ ३६२.५ चौ.मी. ज्याची चतुःसिमा पुर्वेस-प्लॉट नं.१७७-ए, पश्चिमेस-प्लॉट नं.१७६-ए, दक्षिणेस-१८ मिटर रोड, उत्तरेस प्लॉट नं.१७३-ए आणि प्लॉट नं.१७३ ही मिळकत असून सय्यद अली रजा आणि निघत सुलताना रजा यांचे निधन झाल्यापश्चात अर्जदार क्र.१ व २ हे त्यांचे कायदेशीर वारसदार असल्याने मयताच्या नावे असलेली मिळकत ही अर्जदारांच्या नावे करण्याकामी अर्जदारांनी संबंधित सिडको कार्यालयात विचारपुस केली असता सिडको कार्यालयाने अर्जदारांना मा. न्यायालयातून लेटर ऑफ ॲडमिनीस्ट्रेशन सर्टीफिकेटची मागणी केली, म्हणून अर्जदारांनी मुळ अर्ज दाखल केलेला आहे.

या जाहीर प्रगटनद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे अर्जदार यांना लेटर ऑफ ॲडमिनीस्ट्रेशन सर्टीफिकेट देण्याबाबत कोणाचाही उजर आक्षेप असेल, अशांनी सदर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आपला लेखी उजर, आक्षेप योग्य त्या कागदपत्री पुराव्यासह या मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांना लेटर ऑफ ॲडमिनीस्ट्रेशन सर्टीफिकेट देण्यात येईल व मुदतीनंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. करिता आज दिनांक-०७/१२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

क. लिपीक न्यायालय अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, औरंगाबाद

जाहिर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर, औरंगाबाद यांच्या न्यायालयात

सिव्हिल एम.ए. नंबर १७७/२०२४

अर्जदार : १. सुरज पिता सत्यनारायण साबू, वय-३१ वर्ष, धंदा-नोकरी रा. लोहारगल्ली सराफा, सोन्या मारोती मंदिराजवळ, इतवारा, नांदेड
२. कमला भ्र. सत्यनारायण साबू, वय-६२ वर्ष, धंदा-घरकाम, रा. वरीलप्रमाणे
३. सारिका भ्र. हरिष लोहिया, वय-४० वर्ष, धंदा-घरकाम, रा. सरकारवाडा, हेमराजगल्ली, ता.जि.हिंगोली

विरूध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी, औरंगाबाद

प्रकरण : भारतीय वारसा कायद्याप्रमाणे सक्सेशन प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी मा. न्यायालयात ॲड. एस.डी. कोकाटे यांच्यामार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र.१ व ३ चे वडील व अर्जदार क्र.२ चे पती नामे सत्यनारायण ताराचंद साबू हे दिनांक २७/०८/२०२३ रोजी मयत झाले. तसेच मयताची आई ह्या देखील दिनांक ११/११/२००८ रोजी तसेच मयताचे वडील ताराचंद हे दिनांक १२/०४/२००५ रोजी मयत झाले आहे. मयताच्या नावावर खालीलप्रमाणे रक्कमा आहेत. मयत यांना अर्जदाराशिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत.

अ.क्र.	सोसायटीचे नाव	खाते नंबर	खातेदाराचे नाव	ठेव व दिनांक	रक्कम
१	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००४५८२ पा.क्र.४५६४८१	सत्यनारायण ताराचंद साबू	२९/०४/२०२३	१६८७५०
२	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००४२६३ पा.क्र४४२२१७	सत्यनारायण ताराचंद साबू	०१/०७/२०२३	११९४४७
३	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००४२६४ पा.क्र.४४२२१८	सत्यनारायण ताराचंद साबू	०१/०१/२०२३	५६२५०
४	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	२९१८ पा.क्र.२७०४३७	सत्यनारायण ताराचंद साबू	१९/०७/२०२२	११९४८२
५	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	३१२६ पा.क्र.३५८१०३	सत्यनारायण ताराचंद साबू	१९/०७/२०२२	७१६८९
६	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००४२६२ पा.क्र.४४२२१६	सत्यनारायण ताराचंद साबू	०१/०७/२०२३	११९४४७
७	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००४५०३ पा.क्र.४५६३४२	सत्यनारायण ताराचंद साबू	२८/०३/२०२३	११२५००
८	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००५२०२ पा.क्र.४५६३४१	सत्यनारायण ताराचंद साबू	२८/०३/२०२३	११२५००
९	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००४४१८ पा.क्र.४४२५४५	सत्यनारायण ताराचंद साबू	२८/०३/२०२३	६७५००
१०	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४०४७०९ पा.क्र.४५६६६८	सत्यनारायण ताराचंद साबू	०८/०६/२०२३	५६२५०
११	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००४३७१ पा.क्र.४२२३६४	सत्यनारायण ताराचंद साबू	०२/०२/२०२३	५६२५०
१२	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००५२८१ पा.क्र.५३०१७०	सत्यनारायण ताराचंद साबू	०६/०९/२०२३	११२५००
१३	ज्ञानराधा मल्टीस्टेट --,,--	४४००४६५७	सत्यनारायण ताराचंद साबू	२५/०५/२०२३	११२५००
१४	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००४६५८ पा.क्र.४५६५७८	सत्यनारायण ताराचंद साबू	२५/०५/२०२३	११२५००
१५	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००४६५९ पा.क्र.४५६५७९	सत्यनारायण ताराचंद साबू	२५/०५/२०२३	११२५००
१६	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	३०८३ पा.क्र.३५८०३१	सत्यनारायण ताराचंद साबू	०२/०७/२०२३	७१६८९
१७	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००४०६२ पा.क्र.४३०६५१	सत्यनारायण ताराचंद साबू	०२/०५/२०२३	७७६६३
१८	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००४६६० पा.क्र.४५६५८०	सत्यनारायण ताराचंद साबू	२५/०५/२०२३	९००००
१९	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	३०८८ पा.क्र.३५८०५७	सत्यनारायण ताराचंद साबू	०३/०७/२०२३	५९७४१
२०	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	२९१९ पा.क्र.२७०४३८	सत्यनारायण ताराचंद साबू	०४/०६/२०२२	९५५८६
२१	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००४२४३ पा.क्र.३५८१०३	सत्यनारायण ताराचंद साबू	२७/१२/२०२२	११२५००
२२	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००४२४३ पा.क्र.४४२१९२	सत्यनारायण ताराचंद साबू	१२/०६/२०२२	७८७५०
२३	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	२९२७ पा.क्र.२७४५२	सत्यनारायण ताराचंद साबू	१२/०६/२०२२	९५६१४
२४	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	३०८९ पा.क्र.३५८०५८	सत्यनारायण ताराचंद साबू	०३/०७/२०२२	९४२७१
२५	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	३३७१ पा.क्र.३७८५५३	सत्यनारायण ताराचंद साबू	२७/१०/२०२२	११९५५३
२६	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	३३७१ पा.क्र.३७८५५३	सत्यनारायण ताराचंद साबू	२७/१०/२०२२	११९५५३
२७	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००४६८७ पा. क्र. ४५६६३५	सत्यनारायण ताराचंद साबू	०१/०६/२०२३	९००००
२८	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००४७०३ पा.क्र.४५६६६२	सत्यनारायण ताराचंद साबू	०७/०६/२०२३	९००००
२९	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००४७०२ पा.क्र.४५६६६१	सत्यनारायण ताराचंद साबू	०७/०६/२०२३	११२५००
३०	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००५६८६ पा.क्र.४५६६३४	सत्यनारायण ताराचंद साबू	०१/०६/२०२३	११२५००
३१	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	२९२० पा.क्र.२७०४४४	सत्यनारायण ताराचंद साबू	०८/०६/२०२३	११९५१८
३२	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	२९२२ पा.क्र.२७०४४६	सत्यनारायण ताराचंद साबू	०८/६/२०२३	५९७५९
३३	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	२९२१ पा.क्र.२७०४४५	सत्यनारायण ताराचंद साबू	०८/०६/२०२२	११९५१८
३४	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००४२७१ पा.क्र.४४२२२६	सत्यनारायण ताराचंद साबू	०४/०१/२०२३	११२५००
३५	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	३३७० पा.क्र.३७८५५२	सत्यनारायण ताराचंद साबू	२७/१०/२०२२	११९५५३
३६	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	३३६९ पा.क्र.३७८५५१	सत्यनारायण ताराचंद साबू	२७/१०/२०२२	११९५५३
३७	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	३३६८ पा.क्र.३७८५५०	सत्यनारायण ताराचंद साबू	२७/१०/२०२२	११९५५३
३८	ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑफ.क्रेडीट सोसायटी लि.बीड	४४००४५०४ पा.क्र.४५६३४३	सत्यनारायण ताराचंद साबू	२८/०३/२०२३	११२५००
३९	आदर्श महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या.औरंगाबाद	३२/७६२	सत्यनारायण ताराचंद साबू	०२/०६/२०२३	६६८४४
४०	आदर्श महिला नागरी --,,--	०००००७२०	सत्यनारायण ताराचंद साबू	२९/१०/२०२१	१०००००
४१	आदर्श महिला नागरी --,,--	०००००७३४	सत्यनारायण ताराचंद साबू	२९/१०/२०२१	५००००
४२	आदर्श महिला नागरी --,,--	०००००७३१	सत्यनारायण ताराचंद साबू	२९/१०/२०२१	१०००००
४३	आदर्श महिला नागरी --,,--	०००००७३२	सत्यनारायण ताराचंद साबू	२९/१०/२०२१	१०००००
४४	आदर्श महिला नागरी --,,--	८३३५	सत्यनारायण ताराचंद साबू	१३/०५/२०१६	३८४२०
४५	आदर्श महिला नागरी --,,--	०००००७३३	सत्यनारायण ताराचंद साबू	२९/१०/२०२१	५००००
४६	आदर्श महिला नागरी --,,--	३२ / ७६१	सत्यनारायण ताराचंद साबू	०२/०६/२०२३	१३३६८८
४७	आदर्श महिला नागरी --,,--	०००००७२९	सत्यनारायण ताराचंद साबू	२९/१०/२०२१	१०००००
४८	आदर्श महिला नागरी --,,--	०००००७३०	सत्यनारायण ताराचंद साबू	२९/१०/२०२१	१०००००
४९	आदर्श महिला नागरी --,,--	३२८९६	सत्यनारायण ताराचंद साबू	२९/०५/२०२३	८३६३७
५०	आदर्श महिला नागरी --,,--	३१/१३८६६	सत्यनारायण ताराचंद साबू	१०/०९/२०२३	१४०५०९
५१	आदर्श महिला नागरी --,,--	३१/१३०८५७	सत्यनारायण ताराचंद साबू	१३/०४/२०२३	७४९६८
५२	आदर्श महिला नागरी --,,--	३२/१००६	सत्यनारायण ताराचंद साबू	०७/११/२०२२	७४३४५
५३	आदर्श महिला नागरी --,,--	३२/१०४०	सत्यनारायण ताराचंद साबू	२८/०३/२०२३	५१५६५
५४	आदर्श महिला नागरी --,,--	३२/१३९	सत्यनारायण ताराचंद साबू	२८/०३/२०२३	९०२४०
५५	आदर्श महिला नागरी --,,--	३२१००५	सत्यनारायण ताराचंद साबू	०७/११/२०२२	७४३४५
५६	राजस्थानी मल्टीस्टेट को ऑफ क्रेडीट सोसायटी लि.मोंढा, परळी, जि.बीड.	०३७००३००१५९१	सत्यनारायण ताराचंद साबू	३०/१०/२०२१	९५३१३
५७	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	०३७००३००१५९०	सत्यनारायण ताराचंद साबू	३०/१०/२०२१	१२७०८३
५८	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	४४४००३०००७२७	सत्यनारायण ताराचंद साबू	०३/०१/२०२०	७६३७०
५९	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	००३०३७००२७८	सत्यनारायण ताराचंद साबू	०९/११/२०२३	११८७५०
६०	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	००३०३७००२७६९	सत्यनारायण ताराचंद साबू	०९/११/२०२३	११८७५०
६१	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	००३०३७००२७७२	सत्यनारायण ताराचंद साबू	०९/११/२०२३	११८७५०
६२	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	००३०३७००२७७१	सत्यनारायण ताराचंद साबू	०९/११/२०२३	११८७५०
६३	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	००३३७००२७७०	सत्यनारायण ताराचंद साबू	०९/११/२०२३	११८७५०
६४	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	०३७००३००१०१६	सत्यनारायण ताराचंद साबू	२९/०९/२०२३	६३०४४
६५	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	०७००३००१७९९ अनुक्रमांक २४५३	सत्यनारायण ताराचंद साबू	२४/०२/२०२१	३१९३४
६६	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	५२६/९८	सत्यनारायण ताराचंद साबू	२७/०६/२०१८	४५८५०
६७	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	४४४/८७	सत्यनारायण ताराचंद साबू	३०/०६/२०१८	५२५००
६८	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	७४३/७३१	सत्यनारायण ताराचंद साबू	२४/११/२०१७	५८१२५
६९	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	५२७/९९	सत्यनारायण ताराचंद साबू	२७/०६/२०१८	४५८५०
७०	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	५३३/१०५	सत्यनारायण ताराचंद साबू	०१/०७/२०१८	१९६८१
७१	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	५३४/१०६	सत्यनारायण ताराचंद साबू	०१/०७/२०१८	१९६८१
७२	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	५३५/१०७	सत्यनारायण ताराचंद साबू	०१/०७/२०१८	१९६८१
७३	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	५३६/१०८	सत्यनारायण ताराचंद साबू	०१/०७/२०१८	१९६८१
७४	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	५३७/१०९	सत्यनारायण ताराचंद साबू	०१/०७/२०१८	१९६८१
७५	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	५३८/११०	सत्यनारायण ताराचंद साबू	०१/०७/२०१८	१९६८१
७६	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	६४२	सत्यनारायण ताराचंद साबू	०१/११/२०१७	५९३७५
७७	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	०३७००३००७९८ २४५२	सत्यनारायण ताराचंद साबू	२४/०२/२०२१	४८९६५
७८	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	७४६/७३४	सत्यनारायण ताराचंद साबू	२४/११/२०१७	१८६००
७९	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	५३२/१०४	सत्यनारायण ताराचंद साबू	०१/०७/२०१८	१९६८१
८०	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	५३१/१०३	सत्यनारायण ताराचंद साबू	०१/०७/२०१८	५७८८४
८१	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	५२९/१०१	सत्यनारायण ताराचंद साबू	०१/०७/२०१८	५७८८४
८२	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	०३७००३००२०९५	सत्यनारायण ताराचंद साबू	२८/०५/२०२२	५६२२९
८३	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	०३७००३०००७८८	सत्यनारायण ताराचंद साबू	१८/०६/२०२०	१३१२५०
८४	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	०३७००३०००७८६	सत्यनारायण ताराचंद साबू	१८/०६/२०२०	१३१२५०
८५	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	५३०/१०२	सत्यनारायण ताराचंद साबू	०१/०७/२०१८	५७८८४
८६	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	७४४/७३२	सत्यनारायण ताराचंद साबू	२४/११/२०१७	१८६००
८७	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	४९५	सत्यनारायण ताराचंद साबू	०१/०६/२०१७	५९३७५
८८	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	७४५/७३३	सत्यनारायण ताराचंद साबू	२४/११/२०१७	१८६००
८९	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	७४७/३५	सत्यनारायण ताराचंद साबू	२४/११/१७	१८६००
९०	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	८२	सत्यनारायण ताराचंद साबू	३/१/१७	५८१२५
९१	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	६४१	सत्यनारायण ताराचंद साबू	१/११/२०१७	५९३७५
९२	राजस्थानी मल्टीस्टेट --,,--	७४८/७३६	सत्यनारायण ताराचंद साबू	२४/११/२०१७	१९७६३

वरीलप्रमाणे मयताच्या नावावर रक्कमा असून त्या रक्कमा अर्जदार यांच्या नावे नामांतर हस्तांतर करण्याकरीता सक्शेसन प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी सक्शेसन प्रमाणपत्र देण्यात यावे.

त्याअर्थी ह्या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या नावावर सक्शेसन प्रमाणपत्र देण्यात यावे व सक्शेसन प्रमाणपत्र देण्याबाबत ज्या कोणास उजर, आक्षेप, हरकत असेल अशांनी हे जाहीर नोटीस प्रसिध्दीस आल्यापासून ३० दिवसाच्या आत आपला उजर, आक्षेप नोंदवावा. आज दिनांक /०९/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. आदेशावरून

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर, औरंगाबाद